


मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » गुरुवार, दि. 15 ऑगस्ट 2024 | पान- 1


## आयुक्त शेखर सिंह यांच्या गाडीची काच फोडली..!

**हल्ला करणाऱ्या व्यक्तींमध्ये एका दृष्टिहीन व्यक्तीचा ही समावेश आहे.**



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेत स्वतंत्र दिन साजरा होत असतानाच महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या गाडीच्या काचा फोडण्यात आल्या. गाडीवर हल्ला करणाऱ्या व्यक्तींमध्ये एका दृष्टिहीन व्यक्तीचा ही समावेश आहे. प्रशासनाने समस्या न सोडविता जाणीवपूर्वक त्रास दिला. असा आरोप करत दोघांनी हे पाऊल उचललं आहे. ध्वजारोहण झाल्यावर महापालिका आयुक्तांच्या डोळ्या देखत ही घटना घडली अन महापालिकेत एकच खळबळ उडाली.

महापालिकेच्या मुख्य इमारतीत स्वतंत्र दिन साजरा होत होता. आयुक्त शेखर सिंह यांनी ध्वजारोहण केलं, त्यानंतर पालिकेने आयोजित केलेले काही उपक्रम सुरू होते. त्याचवेळी दृष्टिहीन व्यक्ति सह दोघांनी आयुक्तांच्या गाडीच्या काचा फोडल्या अन पालिकेत एकच खळबळ उडाली. पालिकेच्या सुरक्षा रक्षकांनी तातडीनं या दोघांना शांत केलं.

या दोघांनी हे टोकाचं पाऊल का उचललं, हे कारण शोधण्यासाठी पालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी चौकशी सुरू केली. माझ्या टपरीवर वारंवार कारवाई केली जातीये, ऊसाच्या रसाचे गुऱ्हाळ टाकण्यासाठी परवानगी दिली नाही, रमाबाई आवाज योजनेतील घरकुलास निधी दिला जात नाही, सोबतच पालिकेच्या रुग्णालयात उपचाराची तत्परता दाखवली जात नाही असे आरोप या दोघांचे होते.







# महापालिकेच्या मिळकतकर विभागाचे खासगीकरण?

## मिळकत विभागाच्या संगणकीकरणाच्या नावाखाली या विभागाचे खासगीकरण करण्याचा घाट महापालिका प्रशासनाने घातला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या उत्पन्नाचा एकमेव हक्काचा स्रोत असलेल्या मिळकत विभागाच्या संगणकीकरणाच्या नावाखाली या विभागाचे खासगीकरण करण्याचा घाट महापालिका प्रशासनाने घातला आहे. महापालिकेच्या स्मार्ट सिटी, विद्युत विभाग, जायका प्रकल्प, पीएमपीमध्ये काम मिळविणाऱ्या या कंपनीवर महापालिकेची ‘ प्रीत’ जडल्याने या कंपनीस हे काम दिले जाणार आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या कंपनीसोबत अद्याप कोणताही करार झालेला नाही. त्यांना मान्यता देण्याचा कोणताही प्रस्ताव मंजूर नाही, तसेच त्यांना कोणताही कायदिश दिलेला नसतानाही या कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून मिळकतकर विभागात काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे थेट महापालिकेची गोपनीय माहितीच एक प्रकारे ताब्यात घेतली जात असल्याचे समोर आले आहे..

महापालिकेची संगणक यंत्रणा जुनी आहे. ती अपग्रेड करण्यासाठी एका खासगी बँकेने ८ कोटींचा सीएसआर दिला आहे. संबधित बँकेनेच ही कंपनी नेमली असून, त्यानुसार हे काम केले जाणार आहे. कंपनीला कोणताही कायदिश दिलेला नाही.

पालिकेची संगणक प्रणाली जुनाट असल्याचा भास निर्माण करत एका बड्या खासगी कंपनीने महापालिसेस सीएसआरचे आमिष दाखवत नवीन संगणक प्रणाली विकसित करण्याचे सुचविले.

आयटी हब असलेल्या पुण्यातील कंपन्यांचे प्रस्ताव मागविण्याऐवजी बँकेकडून शासनाच्या या कंपनीलाच काम देणार असल्याचे पालिकेस कळविले. त्यासाठी ही कंपनी इतर कामे करत असल्याचा निकष दाखविण्यात आला.




### तीन वर्षे कंपनीच पाहणार काम

» ही संगणक प्रणाली विकसित झाल्यानंतर त्याचे कोणतेही प्रशिक्षण महापालिका कर्मचाऱ्यांना दिले जाणार नाही. याउलट ही यंत्रणा नवीन असल्याने देखभाल दुरुस्तीचा कालावधी पुढे करत कर संकलनाचे सर्व कामकाज या कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या हातात दिले जाणार आहे. त्यामुळे नवीन संगणक प्रणाली कंपनीच चालविणार असून, कर आकारणीपासून, कर रचनेत बदल, दंड आकारणी, अर्जानुसार दंड कमी करणे, कर लावणे हे सर्व काम त्यांच्या हातात जाणार आहे. त्यामुळे एक प्रकारे मिळकतकराची सर्व कामे हीच कंपनी पाहणार असल्याचे अप्रत्यक्षपणे स्पष्ट होत आहे.

### काय आहे प्रकार...

» महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडे शहरातील सर्व मिळकतींची माहिती आहे. त्यासाठी महापालिकेने २००८ मध्ये संगणक प्रणाली विकसित केली असून, त्यात अनेकदा सुधारणा केली आहे. मागील वर्षी देशातील सर्वाधिक चांगली कर संकलन यंत्रणा म्हणून केंद्र शासनानेच महापालिकेस गौरविले आहे, तसेच देशातील अनेक शहरे महापालिकेच्या धर्तीवर संगणक प्रणाली विकसित करत आहेत. असे असताना पालिकेची संगणक प्रणाली जुनाट असल्याचा भास निर्माण करत एका बड्या खासगी कंपनीने महापालिसेस सीएसआरचे आमिष दाखवत नवीन संगणक प्रणाली विकसित करण्याचे सुचविले. त्यानुसार आयटी हब असलेल्या पुण्यातील कंपन्यांचे प्रस्ताव मागविण्याऐवजी बँकेकडून शासनाच्या या कंपनीलाच काम देणार असल्याचे पालिकेस कळविले. त्यासाठी ही कंपनी इतर कामे करत असल्याचा निकष दाखविण्यात आला. विशेष म्हणजे महापालिकेनेही कोणतेही आढेवेढे न घेता थेट कराराची प्रक्रिया सुरू केली. अद्याप करारही झाला नसताना करसंकलन विभाग ताब्यात घेण्याची घाई झालेल्या या कंपनीने आपले कर्मचारी पालिकेत नेमून संगणक प्रणालीचे दैनंदिन कामकाजही सुरू केले आहे.

> करारही झालेला नाही. मात्र, त्यांना संगणक प्रणालीची माहिती हवी असल्याने त्यांचे कर्मचारी काम करत आहेत. मात्र, त्याचा गैरवापर होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.
>
> \- पृथ्वीराज बी. पी (अतिरिक्त आयुक्त)

# पुणेकरांना घरबसल्या पीएमपी बसचे लोकेशन पाहता येणार, बसच्या तिकीटासह, मेट्रो तिकीट देखील मिळणार

## अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर पीएमपी प्रशासने डिजिटल युगासोबत जाण्याचा निर्णय घेत 15 ऑगस्टला 'आपली पीएमपीएमएल' ॲपचे उद्घाटन, 17 ऑगस्टपासून प्रवाशांच्या सेवेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांची जीवनवाहिनी म्हणून काम करणाऱ्या पीएमपी बसची वाट पाहण्याची एक वेगळीच मजा आहे. मात्र, धावपळीच्या युगात आता कोणाला वाट पाहण्याची सवय राहिली नाही. अगदी वेळेला सर्व गोष्टी हव्या आहेत. त्यामुळे पीएमपी बसची देखील आता वाट पाहावी लागणार नाही. कारण घर बसल्याच पीएमपी बसचे लोकेशन पाहता येणार आहे. तसेच तिकीटही घेता येणार आहे. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर पीएमपी प्रशासने डिजिटल युगासोबत जाण्याचा निर्णय घेत 'आपली पीएमपीएमएल' ॲप प्रवाशांच्या सेवेसाठी आणले आहे. त्यामुळे प्रवाशांचा मोठा त्रास वाचणार आहे.

'आपली पीएमपीएमएल' या मोबाईल ॲपचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर हे मोबाईल ॲप १७ ऑगस्ट २०२४ पासून सुरू प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. हे मोबाईल ॲप हे गुगल प्ले स्टोअर वर आपली पीएमपीएल (APLI PMPML) या नावाने उपलब्ध असून ॲन्ड्रॉईड मोबाईल मध्ये डाऊनलोड करता येईल.



### प्रवाशांना मोठा फायदा होणार

» अध्यक्षांची बदली होताच यंत्रणा थंडावली. हे ॲप तांत्रिक अडचणीत अडकले असल्याचे सांगितले जात होते. ॲपचे सादरीकरण करताना थोडक्यात माहिती सादर केली होती. प्रवाशांना हव्या असलेल्या सुविधा त्यात दिलेल्या नव्हत्या. त्यामुळे पुन्हा याचा विचार केला जात होता. ॲपमध्ये प्रवाशांच्या सुविधांचा त्यात समावेश केला जाणार होता. यामुळे वेळ लागणार असल्याचे प्रशासानाकडूने स्पष्ट केले होते. अखेर ॲप सुरु केल्यामुळे आता प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

### 'आपली पीएमपीएमएल' या मोबाईल ॲपचे फायदे...

» प्रवाशांना त्यांच्या करंट लोकेशन वरून इच्छित स्थळी जाणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बसमार्गाची माहिती मोबाईल ॲपवर समजणार.

» मोबाईल ॲप मधून बसचे लाईव्ह लोकेशन प्रवाशांना दिसणार आहे. यामुळे बस थांब्यावर किती वेळात येणार हे देखील समजणे शक्य होणार आहे. थोडक्यात बसचे लाईव्ह ट्रॅकिंग होणार आहे.

» मोबाईल ॲप वरून प्रवाशांना ऑनलाईन तिकीट युपीआय द्वारे बुक करता येईल.

» या मोबाईल ॲप वरून प्रवाशांना ४०, ५० व १२० रुपयांचे दैनंदिन पास काढता येणार आहेत.

» मोबाईल ॲप वरून प्रवाशांना त्यांच्या तक्रारी देखील नोंदविता येणार आहेत.

» मोबाईल ॲप वरून मेट्रो तिकीट देखील काढता येणार आहे.

# पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात मोठा खांदेपालट

## 19 पोलीस निरीक्षक, 5 साहाय्यक निरीक्षक : 6 उपनिरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात मोठी खांदेपालट झाली आहे. शहर पोलीस दलातील १९ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. त्यासह पाच साहाय्यक पोलीस निरीक्षक, सहा पोलीस उपनिरीक्षक यांचीही बदली झाली आहे. त्याचबरोबर चार अधिकाऱ्यांना नियंत्रण कक्ष तसेच पोलीस मुख्यालय येथे संलग्न करण्यात आले होते. त्यांचे आदेश रद्द करत त्यांना मूळ ठिकाणी पाठवण्यात आले आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सोमवारी (१२ ऑगस्ट) रात्री दिले आहेत. नियंत्रण कक्षातील नऊ पोलीस निरीक्षकांची पोलीस स्टेशन आणि विशेष शाखेत नेमणूक करण्यात आली आहे.




### तीन अधिकाऱ्यांचे संलग्नतेचे आदेश रद्द

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले होते. ते आदेश रद्द करून त्यांच्या नेमणुकीच्या मूळ ठिकाणी चिंचवड पोलीस स्टेशन येथे पाठवण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक सतेज जाधव यांची मुख्यालय येथे संलग्न करण्यात आले होते. ते आदेश रद्द करून नेमणुकीच्या मूळ ठिकाणी हिंजवडी वाहतूक विभाग येथे पाठवण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक सचिन देशमुख यांची पिंपरी पोलीस स्टेशन ते वाकड पोलीस स्टेशन अशी बदली झाली होती. ती बदली रद्द करण्यात आली आहे.

### त्या पाच अंमलदारांचे संलग्न आदेश रद्द

आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेले तीन तर सायबर सेलमध्ये कार्यरत असलेल्या दोन अंमलदारांचे संलग्न आदेश रद्द करण्यात आले आहेत. आर्थिक गुन्हे शाखेतील विजय शेळकंदे यांची निगडी पोलीस स्टेशन, विश्वनाथ सलगरे यांची नियंत्रण कक्षात, दीपक खरात यांची पोलीस मुख्यालयात नेमणूक करण्यात आली. तसेच सायबर सेलमध्ये कार्यरत असलेले आनंद मुठे आणि बळीराम नवले यांची पोलीस मुख्यालयात नेमणूक करण्यात आली आहे.

### 213 पोलीस अंमलदारांच्या अंतर्गत बदल्या

» पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील २१३ पोलीस अंमलदारांच्या अंतर्गत बदल्या झाल्या. याबाबत पोलीस उपायुक्त (मुख्यालय) माधुरी कांगणे यांनी सोमवारी (१२ ऑगस्ट) आदेश दिले आहेत. दरवर्षी मे महिन्यात शहर पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या होतात. यावर्षी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने या बदल्या पुढे ढकलल्या गेल्या. त्यामुळे दोन महिने उशिरा या बदल्या झाल्या आहेत. एका पोलीस ठाण्यात सहा वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. तर मुख्यालयातील कर्मचाऱ्यांना मोटार परिवहन विभाग, पोलीस स्टेशन, गुन्हे शाखेत नेमणूक देण्यात आली आहे. मुख्यालयात कार्यरत असलेल्या ९८ कर्मचाऱ्यांची मोटार परिवहन विभागात नेमणूक करण्यात आली आहे, तर वायरलेस विभग, नियंत्रण कक्ष, तळेगाव पोलीस स्टेशन, वाहतूक शाखा, गुन्हे शाखा, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, विशेष शाखा, आळंदी पोलीस स्टेशन, शिरगाव पोलीस स्टेशन, पिंपरी पोलीस स्टेशन, मिडिया सेल, निगडी पोलीस स्टेशन, हिंजवडी पोलीस स्टेशन येथून २१ कर्मचारी मुख्यालयात पाठवण्यात आले आहेत.

---

# 'घरोघरी तिरंगा' मोहीम तसेच 'हरित सेतू' उपक्रमाच्या जनजागृतीसाठी आकुर्डीत भव्य सायकल रॅली संपन्न

## पादचाऱ्यांसाठी, सायकलप्रेमी तसेच लहान शाळकरी मुलांसाठी आणि रहिवाशांसाठी सार्वजनिक परिसर हा स्वच्छ, सुंदर आणि उत्साहवर्धक बनवण्याच्या उद्देशाने आपण हरित सेतू हा उपक्रम राबवीत आहोत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पादचाऱ्यांसाठी, सायकलप्रेमी तसेच लहान शाळकरी मुलांसाठी आणि रहिवाशांसाठी सार्वजनिक परिसर हा स्वच्छ, सुंदर आणि उत्साहवर्धक बनवण्याच्या उद्देशाने आपण हरित सेतू हा उपक्रम राबवीत आहोत, तसेच घरोघरी तिरंगा उपक्रमाच्या माध्यमातून सर्व नागरिकांनी आपल्या घरांवर तिरंगा झेंडा फडकवावा, तसेच महापालिकेच्या हरित सेतू उपक्रमात देखील आपला सहभाग नोंदवून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने घरोघरी तिरंगा या मोहीम तसेच हरित सेतू उपक्रमाची जनजागृती करण्यासाठी आज सकाळी ६ वाजता आकुर्डी परिसरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते.

कार्यक्रमात सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, उपआयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, संध्या वाघ, सुनील पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच इंडो ॲथलेस्टिक्स सोसायटी (आय.ए.एस.) चे गजानन खैरे आणि त्यांच्या संस्थेचे संपूर्ण सहकार्य या भव्य सायकल रॅलीला लाभले. त्यांच्या सहकार्याने सायकल फेरी सुरक्षितपणे यशस्वी झाली. आजच्या रॅलीत आयुक्त शेखर सिंह यांच्यासह सुमारे ५५३ सायकलपटूंनी आपला सहभाग नोंदवला.

सायकल रॅलीचे प्रस्थान १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता आकुर्डी येथील ग.दि. माडगुळकर सभागृह येथून झाली. ही रॅली पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयासमोरून आकुर्डी रेल्वे स्टेशनकडे जाईल. तेथून अप्पूघर चौक – हुतात्मा चौक – छत्रपती संभाजी महाराज चौक – लाल बहादूर शास्त्री चौक – गांधी हॉस्पिटल – फ क्षेत्रीय कार्यालय – लोकमान्य हॉस्पिटल – म्हाळसाकांत चौक – नॅशनल सुपर मार्केट – संजय काळे ग्रेड सेपरेटर – पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय या मार्गाने मार्गस्थ होऊन पुन्हा आकुर्डी येथील ग.दि. माडगुळकर सभागृह या ठिकाणी रॅलीचा समारोप होईल. जास्तीत जास्त नागरिकांनी या भव्य सायकल रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले होते.

### महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम

» केंद्र शासनाच्या वतीने घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्याबाबत मार्गदर्शन सूचना जारी करण्यात आल्या असून महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास तिरंगा स्वाक्षरी मोहीम, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# कलागुणांना वाव मिळावा म्हणून सुविधा देणार

## संवाद सत्रात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची आयुक्तांची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना करत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण क्षमता विकसित करण्यासाठी शाळांमध्ये अनुकूल वातावरण निर्माण करण्यास महापालिका कटिबद्ध आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीची महत्त्वाची भूमिका राहणार आहे, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे शिक्षण विभागाच्या वतीने संवाद सत्राचे आयोजन करणात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.




महापालिका शाळांमध्ये शैक्षणिक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात अनेक उपक्रम राबवण्यात येतात. या सर्व योजना व उपक्रमांचा अंतिम उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. त्यामुळे कला, क्रीडा, शिक्षण, नेतृत्व, संशोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन असे विविध पैलू विद्यार्थ्यांच्या अंगी रुजावेत, त्यांच्या अंगी जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी विविध उपक्रम नवनवीन संकल्पना राबवून पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिका आणि शिक्षण विभाग कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सुरक्षा विषयक लेखापरीक्षण करून सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, क्रीडा विषयक शिक्षक नेमण्यात आले आहेत. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी आपल्या कलागुणांनुसार कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. तसेच गैरहजर मुलांना शाळांमध्ये आणण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीने सांघिक भूमिका बजावली पाहिजे, असेही आयुक्त सिंह म्हणाले. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, उपशिक्षणाधिकारी बुधा नाडेकर, संगत संस्थेच्या समुपदेशन प्रमुख प्राची खांडेपाल तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, महापालिका शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक उपस्थित होते.

### गुणवत्ता वाढीसाठी समुपदेशकांची नियुक्ती

» विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषांनुसार विद्यार्थ्यांचे पूर्व मूल्यांकन करण्यात येऊन शिक्षकांनी अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेचे तंतोतंत निरीक्षण करावे. तसेच महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि विकासात्मक गरजा समजून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळांचे व शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेने शाळांमध्ये शिक्षकदेखील नेमले आहेत. राज्य शालेय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जिल्हास्तर गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी भारत दर्शन सहलीचे नियोजन सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये भाषा आणि संख्याज्ञान वाढवण्यासाठी उत्कृष्ट सराव पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

### भाषा आणि गणित विषयांसाठी संकल्पनात्मक पुस्तक

» संवादसत्रादरम्यान, विद्यार्थ्यांमध्ये भाषाज्ञान आणि संख्याज्ञान व आकडेमोड कौशल्य विकसित करण्यासाठी विविध संकल्पनात्मक पुस्तक शिक्षण विभागाने नव्याने तयार केले आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन आयुक्त शेखर सिंह तसेच अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले. या पुस्तिकेमध्ये इयत्ता ३ री ते ८ वी तील विद्यार्थ्यांसाठी भाषा आणि गणित विषयामधील मूलभूत संकल्पनांची माहिती देण्यात आली आहे. या सक्षम कार्यक्रम पुस्तिकेची माहिती प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली.

# संतांच्या विचाराने जीवनात सकारात्मक बदल

## सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचा पारितोषिक वितरणावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांचे प्रतिपादन

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभली आहे. या संस्कृतीचे जतन होणे गरजेचे आहे. पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार करण्यापेक्षा संतांच्या विचारांचा अंगीकार केल्यास जीवनात सकारात्मक बदल होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका, स्मार्ट सिटी यांच्या वतीने सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पद्मश्री गिरीश प्रभुणे, हभप शिरीष महाराज मोरे, संतोष शिंदे, रमेश सावरकर, उपायुक्त अण्णा बोडदे, मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, कावेरी घंगाळे, पियूष सजगणे, संजय बनसोडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले, भारतीय संस्कृतीचे महत्त्व मुलांच्या मनावर बिंबवण्यासाठी अशा स्पर्धेचे महापालिकेच्या आयोजन केले. हे कौतुकास्पद आहे. या माध्यमातून मुलांना संतांनी केलेले कार्य आणि आपली संस्कृती समजण्यास मदत होणार आहे. शिरीष महाराज मोरे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या पोशाखाचा देखील आपल्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडतो. आज आपण संतांची वेशभूषा केलेली आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन आपण आपले आयुष्य घडवावे. आपल्या घरामधील मुलांवर संतांच्या विचारांचे पालकदेखील अभिनंदनास पात्र आहे असे ते यावेळी म्हणाले. मुलांमध्ये विविध कलागुण असतात. या कलागुणांना योग्य वाव मिळाल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. तसेच अशा उपक्रमांमुळे मुलांच्या बालमनावर चांगले संस्कार होतात. त्या अनुषंगाने आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




या स्पर्धेच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले. सदर सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचे मागील वर्षीदेखील आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एक हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. या वर्षीदेखील स्पर्धेचे व्यापक स्तरावर आयोजन करण्यात आले. या वर्षी स्पर्धेमध्ये ४००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये पहिल्या फेरीत १७०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामधून दुसऱ्या फेरीसाठी १८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी, संत, वारकरी यांच्या पारंपरिक वेशभूषा सादर केल्या. स्पर्धेसाठी पीसीएमसी स्मार्ट सारथी मोबाईल ॲपच्या माध्यमातून प्रवेशिका सादर करण्यात आल्या. आषाढी एकादशी सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते चौथी, इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी असे गट होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी १०,०००, दुसऱ्या क्रमांकासाठी ७,००० आणि तिसऱ्या क्रमांकासाठी ५,००० तसेच प्रत्येक गटात ३ उत्तेजनार्थ बक्षिसे असे पारितोषकाचे स्वरूप ठेवण्यात आले आहे. दि. ९ जुलै रोजी झालेल्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी वेशभूषेचे प्रात्यक्षिक सादर केले. तन्वी किरण लवटे या इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनीने गणेश वंदना सादर केली. तिला मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सम्मानित करण्यात आले. शुभांगी भोईटे, विशाखा शेरे, आणि सुचित्रा झणकार या परीक्षकांनी स्पर्धेचे परीक्षण केले.